# महाराष्ट्र शासन
# शासकीय विधी महाविद्यालय,
## 'ए' रोड चर्चगेट, मुंबई
## कंत्राटी पदभरती जाहिरात - २०२६
### (Walk-in Interview / थेट मुलाखतीद्वारे)

शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई येथील प्रशासकीय व कार्यालयीन कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यासाठी खालील पदे **निव्वळ कंत्राटी पद्धतीने थेट मुलाखतीद्वारे (Walk-in Interview)** भरण्यात येणार असून, पात्र व इच्छुक उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या दिनांक, वेळ व ठिकाणी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहावे.

| अ.क्र. | पदाचे नाव | पदसंख्या | किमान शैक्षणिक पात्रता व आवश्यक अर्हता | मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | **कंत्राटी लिपिक** | ३ | १) कोणत्याही शाखेची पदवी उत्तीर्ण.<br>२) मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. व इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि.चे शासकीय प्रमाणपत्र.<br>३) MS-CIT किंवा समतुल्य संगणक प्रमाणपत्र आवश्यक. MS Office, Internet व Online Forms चे ज्ञान आवश्यक. | **₹२०,०००/- प्रतिमाह** |
| २ | **कंत्राटी शिपाई** | ३ | १) किमान १० वी उत्तीर्ण.<br>२) मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेचे ज्ञान आवश्यक. | **₹१५,०००/- प्रतिमाह** |

इच्छुक व पात्र उमेदवारांनी **विहित नमुन्यातील अर्ज** महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर www.glcmumbai.com उपलब्ध करून दिलेल्या नमुन्यानुसार भरून, त्यासोबत आवश्यक कागदपत्रांच्या **स्वसाक्षांकित प्रती व मूळ कागदपत्रांसह** वरील दिनांकास थेट मुलाखतीस उपस्थित राहावे.

उमेदवारांनी मुलाखतीस उपस्थित राहताना अर्जाची प्रत, शैक्षणिक पात्रतेची प्रमाणपत्रे, जन्मतारखेचा पुरावा, संगणक प्रमाणपत्र, टंकलेखन प्रमाणपत्र (लिपिक पदासाठी), अनुभव प्रमाणपत्र (असल्यास) तसेच इतर आवश्यक कागदपत्रे सोबत आणावीत.

सदर नियुक्ती निव्वळ कंत्राटी स्वरूपाची असून, ती ११ महिन्यांच्या कालावधीकरिता राहील. सदर कंत्राटी नियुक्तीमुळे उमेदवारास नियमित शासकीय सेवेत नियुक्तीचा कोणताही हक्क प्राप्त होणार नाही. अर्जामध्ये अथवा सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये चुकीची अथवा खोटी माहिती आढळून आल्यास संबंधित उमेदवाराची उमेदवारी/नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

प्रशासकीय कारणास्तव सदर भरती प्रक्रिया **रद्द अथवा स्थगित करण्याचा तसेच पदसंख्येत वाढ अथवा घट करण्याचा अधिकार** प्राचार्य, शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई यांना राहील.

**थेट मुलाखतीचा तपशील**

**मुलाखतीचा दिनांक : २८ ऑक्टोबर २०२६**
**मुलाखतीची वेळ : सकाळी ११.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत.**
**मुलाखतीचे ठिकाण : शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई, 'ए' रोड, चर्चगेट, मुंबई.**

AAVaidya
14/10/26

(डॉ. अस्मिता वैद्य),
प्राचार्य
शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई

प्राचार्य
शासकीय विधी महाविद्यालय
'ओ' मार्ग, चर्चगेट, मुंबई-२०.

**दिनांक : १४/१०/२०२६**
**स्थळ : मुंबई**